ANNEXURE 25

# Shrutika Construction

Builders & Developers

Tel.: 022 6515 6514
Mob.: 9867420430

106, Thacker Tower, Plot No. 86, Sector - 17, Near Saraswat Bank, Vashi, Navi Mumbai 400 703. Email : shrutikaconstruction@yahoo.in

दि. ४/०/२०१३

प्रति,

मा.मुख्याधिकारी

कुळगांव बदलापुर नगरपरिषद

कुळगांव बदलापुर पुर्व ता.अंबरनाथ जि.ठाणे

विषय :- मौजे खरवई ता.अंबरनाथ जि.ठाणे येथील सर्व्हे नं ७ हिस्सा नं १ पैकी या मिळकतीवर बांधकाम थांबविण्याचा दिलेला आदेश मागे घेण्यासंदर्भात.

संदर्भ :- कु.ब.न.प./नरवि/२०११/२०१३-१४ दिनांक २६/०६/२०१३ रोजीचे पत्र.

महोदय,

मी श्रुतिका कनस्टक्शनचे प्रोप्रा. संदेश साबळे या पत्राद्वारे कळवु इच्छितो की, मौजे खरवई ता. अंबरनाथ जि.ठाणे येथील सर्व्हे नं ७ हिस्सा नं १ पैकी क्षेत्र ०हे ६० आर ० प्रति मधील ०हे ४२ आर ५ प्रति या मिळकतीवर आपल्या कार्यालयाकडुन कु.ब.न.प./नरवि/बीपी २९१० /३९६ दिनांक २२/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या बांधकाम परवानगीस आपण दिनांक २६/०६/२०१३ रोजी दिलेल्या पत्रान्वये सदरचे बांधकाम थांबविण्यास सुचित केले होते. व त्याकामी मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर उल्हासनगर यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेला आर.सी.एस. १५६/२०१३ चा संदर्भ दिलेला होता.

मी आपणांस पत्राद्वारे कळवु इच्छितो की, दिनांक ०२/०७/२०१३ रोजी मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर उल्हासनगर यांनी जैसे थे ठेवण्याचा आदेश रद्द केलेला आहे. मा.न्यायालयाच्या ही बाब लक्षात आलेली आहे की, तक्रारदार (वादी ) यांची तक्रार ही चुकीची आहे व जैसे थे ठेवण्याचा आदेश कायम ठेवल्यास तो आमचे अतोनात नुकसान होईल त्यामुळे मे.कोर्टाने स्टेटस्को, व्हॅकेट (काढुन) टाकला आहे. मे.

Tel.: 022 6515 6514
Mob.: 9867420430

# Shrutika Construction
Builders & Developers

406, Thacker Tower, Plot No. 86, Sector - 17, Near Saraswat Bank, Vashi, Navi Mumbai 400 703. Email : shrutikaconstruction@yahoo.in



कोर्टाला आमचेवर अन्याय होत आहे ही बाब लक्षात आलेली आहे. मा.न्यायालयाचे वादी यांनी दाखल केलेला अर्जाची दखल घेतली नसल्याकारणाने आपण दिनांक २६/०६/२०१३ रोजी कु.ब.न.प. /नरवि/२०११/२०१३-२०१४ अन्वये चालु असलेले बांधकाम थांबविण्यात यावे असा जो आदेश दिलेला आहे तो रद्द करावा. आपल्या सदरच्या आदेशामुळे आमचे दिवसागणिक ५० ते ६०,०००/- रुपये नुकसान होत आहे. व जर अशाच प्रकारे बांधकाम आम्हांस सदरहू मिळकतीवर करण्यास आपल्याकडुन प्रतिबंध होत गेल्यास सदरचा खर्च हा मोठया स्वरुपात होईल.

तरी आपण आम्हांस त्वरीत बांधकाम चालु करण्याचा आदेश दयावा व दिनांक २६/०६/२०१३ रोजी सर्व्हे नं ७ हिस्सा नं १ पैकी या मिळकतीवरील चालु असलेले बांधकाम थांबविण्याबाबत संदर्भ कु.ब.न.प./नरवि/२०११/२०१३-१४ ची नोटीस रद्द करावी तथा मागे घ्यावी जर आपण आम्हांस बांधकाम परवानगी प्रमाणे दिलेले बांधकाम चालु करण्याची परवानगी न दिल्यास आम्हाला आपणांविरोधात योग्य त्या सक्षम अधिका-याकडे तथा न्यायालयाकडे तक्रार,दावा दाखल करावी लागेल.तसेच नाहकपणे आम्हाला नुकसानीस सामोरे जावे लागत आहे ,त्या नुकसानीची भरपाई आपणांकडुन होण्याकामी दावा दाखल करावा लागेल, याची आपण दखल घ्यावी.

तरी आपणांस आम्ही या पत्राद्वारे नम्रपुर्वक विनंती करतो की, मौजे खरवई ता.अंबरनाथ जि.ठाणे येथील सर्व्हे नं ७ हिस्सा नं १ पैकी या मिळकतीवरील चालु असलेले बांधकाम थांबविण्याबाबत संदर्भ कु.ब.न.प./नरवि/२०११/२०१३-१४ ची नोटीस रद्द करावी व आम्हांस बांधकाम करण्यास परवानगी दयावी.

सही/-

श्रुतिका कनस्टक्शनचे प्रोप्रा. संदेश साबळे
For SHRUTIKA CONSTRUCTION
PROPRIETOR.

**सोबत प्रतः-**
दिनांक ०२/०७/२०१३ रोजी निशाणी क्र. १६
द्वारे दिलेला आदेशाची प्रत